# बॉम्बे व्हेटेरीनरी कॉलेजचा पोवाडा

## शाहीर प्रभाकर प्रल्हादराय जामखेडकर

9-9-1954

स्वातंत्र्य देशाच येत।
पूर्ण जोमात। करण्यासी मात।
शेतीविण धंदा नाही देशात।
गुराढोरान्च शास्त्र लागणार।
पोवाडा प्रभाकर गाणार॥ धृ॥

चौउक १ ला

चाल - व्हेटेरीनरी सायंसचा ऐका थोडा इतिहास॥
पूर्वीची स्थिती सांगतो तुम्हाला आज॥
हाजारो खिल्लार होती भरत खंडात॥
गोधन नाव ते होत त्यासी समयास॥
लाखावरी गणती होती गायी वासरास॥
वाण नव्हती दुधातूपाची कधी कोणास॥
आज पडली अन्नाची वाण मुळी खाण्यास॥
नाव सोडा दुधातूपाच तुम्ही जेवणात॥
प्रेतकळा आली सर्वांना पहा हमखास॥

चाल - सुवर्णाची खाण भारत। पण आज माती हातात॥
कुतर ओढ चालली देशात । कशी होईल शास्त्रीय मात॥

चाल - मुख्य धंदा भरत खंडाला। शेती हाच ठरून गेलेला।
त्याशिवाय उपाय काय बोला। सूचवा तुम्ही तरी आम्हाला।
शेती जीवन देतोओ सर्वाला। कोण देईल जीवन शेतीला।
हे ठेवून तुम्ही ध्यानाला। मूळ उद्द्योग घेवून हाताला।
गुरढोर लावा वाढीला। गाय ही माय सर्वांची ठेवून ध्यानाला॥
जोपासना त्यांची करण्याला। झटपट लागून कार्याला तारा देशाला॥
झुंजमुंज होता समयास। मधूर रव येती कानास।
किण किण घंटेचा नाद। पक्षी गण देई त्या साथ।

आनंदे डोलून पक्षी जाती रानात॥

चाल - मित्राचे होता आगमन। शृष्टीचे मन।
जाते भरून। डौलाने येती सारे गोठ्यात।
दूध देवूनि आपल्या पालकास। पुनरपी जाती सारी रानात॥

चाल - माथ्यावरी सुर्य जवा आला। पिवून पाण्याला।
बसून सावलीला। विसाव्यासंगे रवंथ करीत।
गुराखी पावा फुंकतात। मूक हृदयात।
नाचे आनंद। रमती स्वच्छंद॥

चाल - घरची ओढ परत येण्याला। धूळीचे लोट गगनाला।
म्हणून मंगल घडी कर्याला। योजितीई गोरज मुहूऊर्ताला।
गाईचा आपल्या जीईवनात असा बोलबाला॥
चालस् मोठी मोठी पिकः नभी जाती कणस शेतकरी हस।
आज शेतीची झाली हो दैना॥
गायी गोठ्यामधी वासर लक्षावधि हात तूपामधी।
आज खायाला भाकर मिळेना॥

चाल - पुर्वापार ठावूक आहे आम्हा रोग निदान॥
देवतांचा त्याजला होता पुर्ण आधार॥
भक्ताचे अंगारे घालीत होते थैमान॥
त्यामुळे शास्त्राला नसे मुळी तो मान॥
अती कृर उपाय ठरलेला। चटके देवून गुराढोराला।
हाल हाल करून वेळेला।
मृत्युला देती आमंत्रण ठावा समयाला॥
पण आता काळ बदलला।
टवटवीत पालवी फुटलि व्हेटेरनरीईला॥

चाल - ढोरांचा प्राण राखण्याला।
निगा ठेवण्याला। शिकवी शास्त्राला।
जरूरी भासली भरत खंडात।
शास्त्राशुद्ध शिक्षण पाहीजे आज देशास।
विद्यालय स्थापन केल झटक्यात॥

चाल - मुम्बई व्हेटरनरी का ॅलेजचा ऐका इतिहास॥

चाल - १८८६ सालात।
प्रख्यात मुम्बापूरीत॥
जे एच स्टील स्थापीत।

कॉलेज परळ विभागात॥
अभिमानास्पद हे स्थान।
मुम्बईस असे पहिला मान॥
ईंग्रजीत देती शिक्षण।
विद्द्यार्थ्यांना हेच आकर्षण॥
देशाच्या कानाकोपर्यातून।
शिक्षणार्थ विद्द्यार्थी येत॥
पदवीधर होवून जातात।
पशुपक्षांची सेवा करतात॥
चाल - उणीव भासते पहा प्राअंताला।
दवाखाना गुराढोराला।
पाहिजे आपल्या गावाला।
मान देवून त्यांचे मागणीला।
कृषिवल सेवा करण्याला।
ठाई ठाई दवाखाने स्थापून केल सोयीला॥
ऐकण्या ठेवावे आतापूर्ण अवधान॥।
नॉन मॅट्रिकवाल्यांना देत होते शिक्षण॥
मॅट्रिकची अट घातली मग प्रवेशास॥
चाल - एकोणीसशे चाळीस सालाला।
प्रकार काय झाला। नियम एक केला।
मॅट्रिकवाल्याला।
देईना प्रवेश मुळी कॉलेजात इंटर सायंसची अट प्रवेशास।
चार वर्षांची मुदत शिक्षणास॥
चाल - तीन वर्षे होतीई कोर्सला।
एक वर्ष वाढवून मुदतीला।
नियमित पद्धतीन अभ्यासक्रम वाढविला॥
डिप्लोमा मिळतो नावाला।
जी बी व्ही सी होती समयाला।
तवा विचार पडला प्रिंसिपॉलला।
डिप्लोमापेक्षा डिग्री कोर्स चांगला॥
चाल - प्राध्यापक चढ्ढांच्या मनमोहोल्ल्यात।
विचारान केली मात। सुधारणा करू यात।
डिग्री कोर्स पाहिजे कॉलेजात। कॉलेजात।

ज्ञान देवू सर्व शिष्यास॥
तिकडे झाली खळबळ। करून यशस्वी चळवळ।
केली नाही खळखळ। विद्यापिठाने दिली मान्यता।
मान्यता हो प्राध्यापकांना द्यावी धन्यता॥
चाल - बी एस्सी व्हेट ही डिग्री मिळू लागली॥
विद्यार्थ्यांना सरकारी मदत मिळू लागली॥
शिक्षणाची पातळी वर चढू लागली॥
अंतर्गत ज्ञान सर्वाःन्ना। दिल पाहिजे अगोदर त्यांना।
त्याबिगर किम्मत काय सांगा उथळ ज्ञानाला॥
रोग जंतू कृमी पसरवती रोग साथींना॥
बॅक्टेरिऑलॉजी ती त्यांना।
शिकविती गुराढोरांच्या रोगशास्त्राला॥
चाल - अशी करी शाहीर आशा।
भारत देशा। कीर्तीयुत यशा।
मिळवूनी भर टाकील ज्ञानात।
सुर्य तळपतो जसा गगनात।
तळपूनी देईल ज्ञानप्रकाशास॥
चाल - आता ऐका पुढील गोष्टीला।
गरिबीच वाण देशाला।
शेतकरी अधिक गांजला।
शेतीचा तुकडा आणि बैलजोडी घराला॥
चाल - पुरातन वृत्ती नाही गेली।
पुर्ण भिनलेली। आमुच्या भाळी।
ठाव नाही सांघिक शेती त्यास।
रशिया अमेरिका कशी करतात। मात्र शास्त्राच वावड त्यास॥
त्यामुळे देशाची प्रगती।
खुंटली अती। चालेना मती।
अन्न तुटवडा भासे देशात।
तसची काम नाही देशात।
बैलावर सारी त्याचा भिस्त भारतात॥
चाल - उत्तम प्रतिची गुर हवीत देशाला॥
जोपासना करुनी द्याव जीवन सर्वाला॥
चाल - हिंदुस्तान देश बलवान।

करण्यासी जाण। शेती सम्पन्न।
बलसम्पन्न देश करण्यास।
बैलावर सारी असे मदार।
तवा अन्न वस्त्र कोडे सुटणार॥

चाल - पण एका थोड्या गोष्टिला।
सरकार देत नाही लक्षाला।
याच कारण ॲडमिशन कमी होवू लागल्या॥
दोन गोष्टी पाहिजेत करण्याला।
पगार वाढ केली पाहिजे पहिल्या झटक्याला॥
स्थापाव दुसर कॉलेज याच प्रांताला॥
लोकांचा भरणा नाही त्याला।
याच कारण सांगतो तुम्हाला।
डिग्री कोर्स मोठ्या कॅलेजाला।
शिक्षणाचा दर्जा वाढला।
व्हेटरनरी पदविधराचा दर्जा नाही वाढला॥
देशातील तरूणांना आकर्षण काय बोला॥
मनास येईल तसाच पगार ठरविला॥
जितका कमी देता येईल तितका तो दिला॥
खाजगी प्रॅक्टिसच नाव नाहि कोणाला।
अभ्यासाचा दर्जा वाढला। तरी उपयोग काय त्याचा बोला।
पदवीधर राहीला तसाच खालच्या थराला॥

चाल - मुख्य तंत्र आणू आचरणात।
उत्तम शिक्षण। भरपूर वेतन। आणी काम छान।
पहिले दोन सरकारच्या हातात।
तिसरी गोष्ट साध्य परिणामात॥
अशी आहे आमुची स्थिती।
सांगू मी किती। नाही त्या मिती।
शेवटी प्रार्थना प्रभु चरणास।
उन्नतीप्रत नेई कॉलेजास।
प्रभाकर पूर्ण करी पोवाड्यास॥

समाप्त